



# आपला महाराष्ट्र


मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२८३ ■ गुरुवार १६ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26



भतवाल हॉस्पिटल म्हणजेच

गंगाराम हॉस्पिटल

अग्रवाल नगर, मालेगाव रोड, धुळे

मो.नं. 9158587711


# राज्यातील शेतकऱ्यांचे अठ्ठेचाळीस हजार कोटींचे जुने वीज बिल माफ - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई, दि. १५ : राज्यातील बळीराजासाठी साडेसात हॉर्स पॉवरपर्यंतच्या शेतीमधील वीज जोडणीची जुनी बिले माफ करण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबईत विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी वीज बील माफीची घोषणा केली. शेतीला पाणी देण्यासाठी साडेसात हॉर्स पॉवरचे पंप वापरले जातात त्यांना सध्या बिल येत नाही. मात्र, यापूर्वीची जुनी बिले अजूनही प्रत्येकाच्या नावाने खात्यात जमा आहेत. त्याची वसुली कधीही होऊ शकते. त्यामुळे आम्ही हजार कोटी रुपयांची जुनी बिले माफ करणार आहोत. शेतकऱ्यांची पाटी कोरी झाली पाहिजे आणि त्याला पाटीवर नव्याने इतिहास लिहिता आला पाहिजे. यादृष्टीने आम्ही हा निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**

वीज बिल माफ केले म्हणजे वीज कंपनी स्वत:च्या खिशातून पैसे भरत नाही. सर्वसामान्यांच्या बिलावर हा भार पडू नये म्हणून, राज्य सरकार दरवर्षी अर्थसंकल्पातून पंचवीस हजार कोटी रुपये वीज वितरण कंपनीला देत असल्याचे त्यांनी सांगितले. रात्रीच्या वेळी शेतीला पाणी देताना शेतकऱ्यांना सर्पदंश आणि इतर अनेक जीवघेण्या संकटांचा सामना करावा लागतो. यातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी सरकारने सौर कृषी वाहिनी आणि सौर पंप योजना आणल्या आहेत. सध्या राज्यातील शहात्तर टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात आहे. या वर्षाअखेरपर्यंत हे प्रमाण शंभर टक्क्यांवर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. आगामी काळात राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा आठ ते बारा तास पूर्णपणे मोफत वीज पुरवली जाईल, असा **(पान ४ वर)**

## विवाहित मुलीला देखील अनुकंप नोकरी अधिकार

नागपूर, दि. १५ - कर्मचाऱ्यांच्या विवाहित मुलीलाही अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळण्याचा अधिकार आहे, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. केवळ मुलीचे लग्न झाले आहे या कारणावरून तिला अनुकंपा नोकरी नाकारणे हा लिंगभेद ठरू शकतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती द्वय वाय. जी. खोब्रागडे आणि सुशील घोडेस्वार यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

विवाहित मुलगी ही तिच्या कुटुंबाचा अविभाज्य भाग असते. त्यामुळे केवळ वैवाहिक स्थितीच्या आधारावर तिला अनुकंप नोकरीपासून वंचित ठेवणे कायदेशीर दृष्ट्या योग्य नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. चंद्रपूर जिल्ह्यातील ताडाळी येथील कर्मचारी कवडू वानशिंगे यांच्या निधनानंतर त्यांची विवाहित मुलगी तनुजा झाडे यांनी अनुकंपा नोकरीसाठी अर्ज केला होता. **(पान ४ वर)**

# ना.बावनकुळेंच्या आदेशाने भुमाफीयांचे धाबे दणाणले आ.अनुप अग्रवालांच्या त्या लक्षवेधीमुळे चौकशी सुरु

**धुळे, दि. १५ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमांचा भंग करत बोगस कागदपत्रांच्या आधारे शहरातील देवपूरसह तालुक्यातील वडजाई, पिंपरी, नरव्हाळ परिसरातील अनेक शेतजमिनी शेतकरी नसतानाही राज्यासह परराज्यांतील अनेकांकडून लाटत संघटित लँड जिहाद घडवून आणला जात असल्याचा गंभीर प्रकार शहराचे आमदार अनुपभैया अग्रवाल यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधीद्वारे उघडकीस आणला होता. आमदार अग्रवाल यांच्या लक्षवेधीची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गांभीर्याने दखल घेत या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले असून,**




**महिनाभरात याचा अहवाल मागविला आहे.**

या संदर्भात राज्य शासनाच्या कक्ष अधिकारी तेजश्री बिडकर यांनी विभागीय महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि भूमी अभिलेख अधीक्षकांना मंगळवारी (ता.१४) पत्र पाठवत या प्रकरणांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या व्यक्तींविरोधात थेट गुन्हे दाखल करण्यासह कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत.

आमदार अग्रवाल यांनी नुकत्याच झालेल्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे शासनासह संपूर्ण सभागृहाचे लक्ष वेधताना धुळे शहरासह तालुक्यात शेतकरी नसताना बोगस शेतकरी दाखले तयार करणे, खोटे ७/१२ उतारे जोडणे, इतर राज्यांतील जमिनीचे उतारे महाराष्ट्रातील शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून वापरणे, परराज्यांतील प्लॉटची मिळकत पत्रिका शेतजमिनीचा पुरावा म्हणून सादर करणे, बनावट वारस दाखवून व्यवहार करणे, मूळ मालकाने संपूर्ण जमीन विकल्यानंतर पुन्हा वारस उभे करून त्याच जमिनीचे व्यवहार करणे, सरकारी जमिनींची नोंद असतानाही त्या जमिनींची खरेदी-विक्री करणे, बनावट व्यक्ती उभ्या करून दस्त नोंदणी करणे, न्यायालयाने निश्चित केलेल्या किमतीपेक्षा अत्यल्प किमतीवर दस्त करून शासनाचा मुद्रांक महसूल बुडविणे, तसेच शेतकरी नसताना बोगस कागदपत्रांच्या आधारे कृषी **(पान ४ वर)**

# प्रलंबित देयकांसाठी महापालिका आयुक्तांना सेवानिवृत्तांचे निवेदन

**धुळे, दि. १५- महानगरपालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी प्रलंबित देयकांच्या मागणीसाठी महापालिका आयुक्तांना निवेदन सादर केले असून, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन व आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये ग्रॅज्युइटी फरक, पेन्शन थकबाकी, शिल्लक रजा फरक, सहावा वेतन आयोग फरक तसेच प्रलंबित ऑडिट शंकांची पूर्तता या बाबींचा समावेश आहे.**

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, या मागण्यांसंदर्भात यापूर्वी अनेक वेळा पत्रव्यवहार, प्रत्यक्ष भेटी आणि पाठपुरावा करण्यात आला. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काच्या रकमेपासून अनेक वर्षे वंचित राहावे लागत असून, त्यांना आर्थिक, मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. नियमानुसार सेवानिवृत्तीनंतर एका महिन्याच्या आत ग्रॅज्युइटीची रक्कम मिळणे अपेक्षित असताना अनेक कर्मचाऱ्यांना अद्याप ती मिळालेली नाही. **(पान ४ वर)**

## चाकू दाखवून दहशत बिशण थापाला अटक

धुळे, दि.१५ - येथील मोराणे (ता.धुळे) येथील हॉटेल महेंद्र समोर चाकूने दहशत निर्माण करणाऱ्या तरुणास पोलिसांनी पकडले. बिशण गणा थापा (वय ४६ वर्ष, रा. बालाजी नगर, मोराणे) असे त्याचे नाव असून सोमवारी (दि.१३) दुपारी साडेबाराच्या सुमारास हा विनापरवाना चाकू घेऊन फिरत होता. त्याने परिसरातील रहिवासी व भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेज, धुळे येथे अधिपरीचारक दीपक रमेश रासने (वय ४२) यांना भररस्त्यात अडविले, हातातील चाकू दाखवून शिवीगाळ, दमदाटी केली. हवालदार जयकुमार चौधरी यांनी फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

# जिल्हा रुग्णालयात एम.आर.आय.सेवेचे ऑगस्टमध्ये लोकार्पण- अमीन पटेल

**धुळे, दि.१५- धुळे जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक एम.आर.आय. मशीन उपलब्ध झाल्याने जिल्ह्यातील तसेच परिसरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. या महत्त्वपूर्ण सुविधेसाठी अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करणारे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ माजी नगरसेवक तथा समाजसेवक अमीन पटेल यांच्या संघर्षाला अखेर यश प्राप्त झाले असून, या एमआरआय मशीनचे लोकार्पण येत्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे.**

माजी नगरसेवक अमीन पटेल हे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा रुग्णालयात दाखल होणाऱ्या गरजू रुग्णांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत आहेत. रुग्णांना उपचार मिळवून देणे, आवश्यक विभागांशी समन्वय साधणे, रुग्णांना दाखल



करण्यासाठी मदत करणे तसेच त्यांच्या विविध आरोग्यविषयक अडचणींचा सातत्याने पाठपुरावा करणे, या माध्यमातून त्यांनी असंख्य नागरिकांना आधार दिला आहे. धुळे जिल्हा रुग्णालयात एम.आर.आय. मशीन उपलब्ध व्हावी, यासाठी त्यांनी अनेक वर्षे सातत्याने संघर्ष केला. या मागणीसाठी आंदोलने, निवेदने, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तसेच जिल्हा रुग्णालयासमोर आंदोलन करून पाठपुरावा, जिल्हा रुग्णालय प्रशासनाशी चर्चा तसेच संबंधित मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची **(पान ४ वर)**

# गंगामाई फार्मसी कॉलेजमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून शासनाची फसवणूक

**धुळे, दि.१५- नगाव (ता. धुळे) येथील गंगामाई कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बनावट आयडी, पासवर्ड आणि विद्यार्थ्यांची खोटी माहिती केंद्र सरकारच्या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरली, त्यातून ३८ लाख ८९ हजार ४०० रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

गंगामाई कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये २०२१-२२ या वर्षी गैरव्यवहार झाला. संशयीतांनी संगनमत करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी शासनाच्या अधिकृत नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर माहिती व तंत्रज्ञानाचा गैरवापर केला. या पोर्टलवर बनावट आयडी आणि पासवर्ड तयार करून गंगामाई कॉलेज ऑफ फार्मसी, नगाव (धुळे) येथे बोगस विद्यार्थ्यांचे प्रवेश असल्याचे दाखविले. अस्तित्वात नसलेले बोगस कोर्सेस दाखवून पोर्टलवर खोटी माहिती अपलोड केली. या माध्यमातून केंद्र सरकारच्या अल्पसंख्यांक

विद्यार्थ्यांसाठी असलेल्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतला. त्यातून एकूण ३८ लाख ८९ **(पान ४ वर)**

## चाकुचा धाक दाखवत तीन लाखांची वसुली

शिरपूर दि.१५ (का.प्र.) : मोटारसायकलवरुन आलेल्या दोघांनी एका शिक्षकाला चाकूचा धाक दाखवून सोबत नेले. त्याला एका फ्लॅटमध्ये कोंडून तीन लाख रुपये मागितले. त्याच्याकडून क्यूआर कोडचा वापर करुन तीन लाख रुपये खात्यावर घेतले. ही खळबळजनक घटना १३ जुलै रोजी सायंकाळी शहरातील तपनभाई पटेल रस्त्यावर घडली.

या घटनेतून स्वत:ची कशीबशी सुटका करुन घेत प्रांशू नविनकुमार वर्मा (वय ३०) या शिक्षकाने शिरपूर शहर पोलिस ठाणे गाठून फिर्याद दिली. तो उत्तर प्रदेशातील मूळ रहिवासी असून सध्या शहरात जयलक्ष्मी मॉलजवळ राहतो. संशयितांनी त्याला तपनभाई पटेल मार्गावर अडवून **(पान ४ वर)**

# धुळे म.न.पा.च्या हॅप्पी हार्ट प्री स्कूलचे आ.अनुप अग्रवालांच्या हस्ते शुभारंभ



**धुळे, दि.१५- येत्या काही दिवसातच धुळे शहर हे सर्वांगीण विकासाचे शहर असेल मेरा शहर बदल रहा है आणि मूलभूत सुविधांबरोबरच शहराचा शैक्षणिक दर्जा वाढावा यासाठी धुळे महानगरपालिकेने केलेले स्तुत्य काम खरोखरच सुंदर आहे. असे प्रतिपादन आ.अनुप अग्रवाल यांनी हॅपी आर्ट स्कूलच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले.**

धुळे महानगरपालिकेच्या वतीने आ.अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून आणि महापौर मायादेवी परदेशी व आयुक्त नितीन कापडणीस यांच्या माध्यमातून स्वर्गीय आर.आर. पाटील शॉपिंग कॉम्प्लेक्स येथील पहिल्या मजल्यावर हॅप्पी हार्ट प्री स्कूल ही नर्सरी शाळा विकसित करण्यात आलेली असून त्याचा शुभारंभ दि. १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आला.

सदर शाळेच्या माध्यमातून खेळ कला गोष्टी संगीत व डिजिटल शिक्षण यांच्या माध्यमातून मुलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आनंददायी शैक्षणिक वातावरण अत्याधुनिक पद्धतीने निर्माण करण्यात आलेले आहे. यात प्रत्येक वर्गात आकर्षक रंगीत व शैक्षणिक थीमवर आधारित पेंटिंग, लहान मुलांसाठी आकर्षक फर्निचर टेबल बेंचेस खुर्च्या शैक्षणिक कट आउट, अक्षर अंक ओळख लर्निंग डिस्प्ले, विविध प्रकारच्या शैक्षणिक खेळण्याची सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाने **(पान ४ वर)**

## दिव्यांगाना सहा हजार रूपये पेन्शन देण्याची मागणी

धुळे, दि. १५- राज्यातील दिव्यांग नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर आता भाजप दिव्यांग विकास आघाडी आक्रमक झाली आहे. दिव्यांगांना सन्मानाने आणि स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी पन्नासहून अधिक मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे धुळे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करण्यात आले. दिव्यांगांना दरमहा सहा हजार रूपये पेन्शन द्यावे, रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि प्रवासाच्या सुविधांसह अनेक महत्त्वाच्या मागण्यांचा समावेश आहे.

भाजप दिव्यांग विकास आघाडीच्यावतीने जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते **(पान ४ वर)**

# पिंपळनेरला प्रसूतीदरम्यान महिलेचा मृत्यू, निष्काळजी डॉक्टरांवर गुन्हा दाखल

**धुळे, दि. १५ - जिल्ह्यातील पिंपळनेर येथे प्रसूतीसाठी दाखल झालेल्या एकवीस वर्षीय विवाहितेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. संबंधित डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे हा मृत्यू झाल्याचा आरोप मृत महिलेच्या नातेवाईकांनी केला आहे. या प्रकरणी संबंधित डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.**

मिळालेल्या माहितीनुसार, देगाव येथील पूनम सोनू अहिरे (वय २१) यांना प्रसूतीसाठी पिंपळनेर बसस्थानक परिसरातील तावडे हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान रक्ताची आवश्यकता असल्याचे सांगून नातेवाईकांना सटाणा येथून रक्त आणण्यास सांगण्यात आले. मात्र, रक्ताच्या पिशव्या येण्यापूर्वीच प्रसूती करण्यात आल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. प्रसूतीनंतर पूनम अहिरे यांची प्रकृती गंभीर झाल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी धुळे येथील शासकीय रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, रुग्णवाहिका येण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक आणि ग्रामस्थांनी रुग्णालयासमोर आंदोलन करत संबंधित **(पान ४ वर)**

## युद्धामुळे संकट निर्माण गॅस दरवाढीचा धोका

तेहरान, दि. १५ : अमेरिका-इराण युद्धाचा जगातील अनेक देशांना फटका बसला आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील नव्याने निर्माण झालेल्या तणावामुळे केवळ तेल कंपन्याच नव्हे तर गॅसचे संकटही निर्माण होण्याची शक्यता आहे. होर्मुझवर घोंघावणाऱ्या संकटामुळे एलपीजी पुरवठा पुन्हा बाधित होऊ शकतो.

फेब्रुवारीमध्ये जेव्हा अमेरिका आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाले, तेव्हा भारतालाही तेल आणि गॅसच्या तुटवड्याचा सामना करावा लागला होता. जेव्हा दोन्ही देशांमध्ये युद्धविराम जाहीर झाला, तेव्हा जनतेने आणि सरकारने सुटकेचा नि:श्वास टाकला. आता युद्ध पुन्हा **(पान ४ वर)**



# शिंदखेडा ता.तिन एसआयआर कॅम्पला उपजिल्हाधिकारी खेडकर यांची भेट

**शिंदखेडा, दि.१५ - तालुक्यातील देगाव, दिवी, शेवाडे येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित एस.आय.आर (विशेष संक्षिप्त पुनरीक्षण) कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणी कॅम्पला गावकऱ्यांनी प्रचंड गर्दी केली होती. या विशेष मोहिमेचे काम पाहण्यासाठी शिंदखेडा तालुक्याचे मुख्य निवडणूक मतदान अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर साहेब यांनी सदिच्छा आढावा भेट दिली.**

याप्रसंगी त्यांच्यासोबत मंडळ अधिकारी श्रीमती अनिता भामरे मॅडम, तलाठी मनोज मंगळे ,अशोक गिरनार उपस्थित होते. कॅम्पला भेट दिल्यानंतर शाळेच्या वतीने बी.एल.ओ. (१९४) राकेश बागुल यांनी सर्व मान्यवर शासकीय अधिकाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला. डिजिटलायझेशन आणि विद्यार्थ्यांचा सहभाग या कॅम्पमध्ये मतदान प्रक्रियेसंबंधी नागरिकांच्या सर्व शंकांचे निरसन करून ईएफ फॉर्मचे वाटप व **(पान २ वर)**

# पावसासाठी डोंगरगावच्या महिला उतरल्या मैदानात उन्हाची तमा न बाळगता भजन गात काढली फेरी

**शहादा, दि.१५ (प्रतिनिधी)- पावसाळा अर्धा सरला तरी शहादा तालुक्यात अजूनही समाधानकारक पाऊस झालेला नाही. भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत चालली असून पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. दुष्काळाचे सावट गडद होत असताना आता पावसासाठी शहरातील महिलाही पुढे सरसावल्या असून त्यांनी थेट वरुणराजाला साकडे घातले आहे.**



शहरातील डोंगरगाव रोड परिसरातील हरिओम नगर, शांती विहार कॉलनी, महावीर नगर आणि गौरीशंकर नगर या चारही कॉलनीतील महिलांनी आज भर दुपारी उन्हाची तमा न बाळगता हातात टाळ-मृदंग घेत देवाचे भजन गात घरोघरी फेरी काढली.

धोंड्या धोंड्या पाणी दे साय माय पिकू दे, **(पान ४ वर)**

## आर.पी.आय.आठवले गट; बैठकीचे आयोजन

धुळे, दि.१५- रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट धुळे जिल्ह्याच्यावतीने किल्ले लळींग लांडोर बंगला भिमस्मृती यात्रेच्या पुर्वतयारीसाठी दि.१७ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता स्वस्तिक चित्र मंदिर येथे महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीचे अध्यक्षस्थान जिल्हाध्यक्ष प्रभाकर जाधव भुषविणार आहेत.

किल्ले लळींग लांडोर बंगला भिमस्मृती यात्रा मागील तेहतीस वर्षांपासून अखंड सुरू आहे. दि.३१ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या या यात्रोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी महत्वपूर्ण बैठक घेण्यात येत आहे. या बैठकी प्रसंगी **(पान ४ वर)**



# चार राज्यांचा सीमावर्ती भाग संलग्न करा स्वतंत्र भिल्ल राज्याच्या निर्मितीची मागणी

**धुळे, दि. १५ - जिल्ह्यातून स्वतंत्र भिल्ल राज्य निर्मितीची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. भील प्रदेश मुक्ती मोर्चा तर्फे राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मुख्यमंत्री यांच्याकडे धुळे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात स्वतंत्र भील्ल प्रदेश राज्यासह आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक हक्कांसाठी तब्बल त्रेचाळीस मागण्या करण्यात आल्या आहेत.**

जिल्ह्यात भील प्रदेश मुक्ती मोर्चा तर्फे स्वतंत्र भिल्ल राज्य निर्मितीसाठी मागणी करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष वल्लभ मालचे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत ते राष्ट्रपती, पंतप्रधान आणि महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवण्याची विनंती करण्यात आली आहे. या निवेदनात राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रातील सीमावर्ती आदिवासी बहुल भाग एकत्र करून संविधानाच्या अनुच्छेद तीन अंतर्गत स्वतंत्र भिल्ल राज्य स्थापन करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच नऊ ऑगस्टला साजऱ्या होणाऱ्या जागतिक आदिवासी दिनाला राष्ट्रीय सुट्टी घोषित करण्याची मागणीही करण्यात आली आहे. अनुसूचित क्षेत्रांमध्ये संविधानातील कलम २४४ (१) च्या मुळ भावनेनुसार प्रशासन चालवावे. स्थानिक आदिवासींना पोलीस आणि इतर शासकीय भरतीमध्ये प्राधान्य द्यावे, अशीही भूमिका मांडण्यात आली. आदिवासींचे जल, जंगल आणि जमीन यांचे संरक्षण व्हावे, पार-तापी-नर्मदा लिंक प्रकल्प तातडीने रद्द करावा आणि भूमिहीन आदिवासींसाठी लँड बँक उभारून शेतीसाठी जमीन उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. भिल्ली भाषेला संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करून प्राथमिक शिक्षणात स्थान देण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनासोबत आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासासाठी एकूण त्रेचाळीस मागण्यांचे पत्र शासनाकडे सादर करण्यात आले आहे.



# नागरिकांनी न.पा.ची वाट न पाहता स्वखर्चाने बुजवले जीवघेणे खड्डे

शहादा, दि.१५(का.प्र.) - गेल्या दोन-तीन वर्षांपासून शहादा शहराची ओळख परिसरात खड्ड्यांचे शहर म्हणून होऊ लागली आहे. रस्त्यांवर पडलेल्या मोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक, वाहनधारक, पादचारी आणि शाळकरी विद्यार्थ्यांना मोठा शारीरिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. पालिका प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अखेर संतप्त नागरिकांनी स्वतः पुढाकार घेत लोकवर्गणी व स्वखर्चातून रस्त्यावरील जीवघेणे खड्डे बुजवून प्रशासनाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे.**(पान २ वर)**


**दिपक ज्वेलर्स**


सोने- 22 K -1,30,550 रु.+3% GST

सोने- 24 K -1,42,500 रु.+3% GST

चांदी- 2,26,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

# कथितबोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या चौकशीसाठी सरग यांचे उपोषण

**धुळे, दि. १५- कथित बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय नोकरी मिळवल्याचा आरोप असलेल्या गणेश बापूराव शहाणे प्रकरणाचा चौकशी अहवाल जाहीर करण्यात यावा, या मागणीसाठी भाजप दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष संजय सरग यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. शहरातील जेलरोडवर उपोषणास बसलेल्या सरग यांना काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पाठिंबा दिला आहे.**

मुळचे शिरूर (जि. पुणे) येथील गणेश शहाणे यांनी धुळे येथून प्राप्त केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राबाबत काही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रकरणात ससून रुग्णालयाच्या अहवालात कर्णबधिरता नसल्याचे नमूद करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतरही मागील तारखेचे प्रमाणपत्र कसे तयार झाले, तसेच कोरोना संसर्गाच्या काळातील निर्बंध असताना संबंधित तपासणी प्रक्रिया कशी पार पडली, असा प्रश्न संजय सरग यांनी उपस्थित केला आहे. दिव्यांग कल्याण विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच ससून रुग्णालयाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशी अहवाल सार्वजनिक करण्यात आलेला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. या प्रकरणाची**(पान २ वर)**

आपला महाराष्ट्र

# जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक तुरा

नकारात्मक आणि सकारात्मक अशा दोन भुमिकां मध्ये समाज विभागलेला आहे. या दोन पैकी एकही भूमिका नसलेल्या लोकांचा एक गट असतो तो कशातच नसतो. स्वत:तच मग्न असतो. नकारात्मक भूमिकेत वावरणारा वर्ग फार मोठा आहे. परंतु अनैतिकतेच्या मुद्यांवर हा वर्ग नकारात्मक नाही. अवैध व्यवसाय असेल अथवा फसवाफसवी असेल त्यात स्वत:चा फायदा कसा होईल याबाबतचा विचार करणारा आणि त्यानुसार कृती करणारा मोठा वर्ग आहे. आपल्या जिल्ह्यात अशा लोकांची संख्या खूप आहे.त्यांनी जवळ जवळ सर्व क्षेत्रे व्यापून घेतलेली दिसतात. चोऱ्या करून पोट भरणारे आणि ती संपत्ती राजकारणात वापरून नेतृत्व करणारे देखील कमी नाहीत. लोकही त्यांना मान देतात, त्यांचा उदो उदो करतात सध्याचा काळच तसा आहे. आपल्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी ज्या यंत्रणा काम करतात त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश होतो. पण तिथे फारच सुमार बुध्दिचे लोक निवडून पाठविण्यात समाजाचाच पुढाकार असतो

ओरड करणारेही तेच असतात. अशा तऱ्हेने त्याच लोकांनी सगळी क्षेत्रे व्यापून टाकलेली आहेत. शिक्षण क्षेत्रही त्यांनी सोडलेले नाही. पूर्वी पुण्याची बरोबरी करणाऱ्या शिक्षण संस्था आपल्याकडे होत्या मात्र धंदेवाईक लोक या क्षेत्रात घुसल्याने शिक्षणाचे तीन तेरा वाजले.या परिस्थितीतून जिल्हा बाहेर पडण्याची शक्यता आता दिसत नाही.शालार्थ आय डी फसवणूक प्रकरण याच श्रेणीच्या लोकांचे आहे


त्या निमित्ताने जिल्ह्याच्या बदनामीच्या संदर्भात आता पर्यतच्या घोटाळ्यांच्या यादीत आपला जिल्हा सर्वात पुढे आहे.त्यामुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक बदनामीचा तुरा गोवण्यात आपण यशस्वी झालो आहोत. बदनाम हुये तो क्या हुवा नाम तो हुवा यातच समाधान मानणारे आपण लोक आहोत. ज्या कोणी वाडिले नामक व्यक्तिने बनावट शालार्थ आय डी तयार करवून करोडो रूपयांनी सरकारला फसविले. त्यास विविध कलमांखाली नाशिक पोलिसांनी अटक केली. नेहमी असेच होते. आपल्याकडे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची बहुदा नोंद होत नाही.ती बाहेरचं होते आणि तेच पोलीस कारवाई करतात.मग आपल्याला कळते की, घोटाळेबाज धुळ्याचा आहे. तोवर सर्व यंत्रणा अशा लोकांना मदत करीत असतात. त्यांनाही भरपूर वाटा जात असावा.

१९९० च्या दशकात जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागात कोट्यवधीचा घोटाळा झाला होता.राज्यभर तो गाजला होता.त्यास इतरही काही पदर होते. त्या प्रकरणात सुमारे वीस आरोपी होते. त्यांना शिक्षा झाल्या. त्यातील बरेच जामिनावर सुटले आणि पुढे त्यांनी जगाचाही निरोप घैतला. मात्र पुढच्यास ठोकर मागचा शहाणा असे काही घडले नाही. व्यवस्था तीच राहिली. उलट चरणारांची संख्या वाढली. तसेच शालार्थ प्रकरणात होईल. एक वाडिले सापडतो

त्यांच्या नावावर कोट्यवधी रूपयांच्या रकमांची हेराफेरी खपते. पण त्यांची पाळेमुळे शोधली तर आणखी मोठे घबाड हाती लागेल. त्या सर्वांची एस आय टी चौकशी होईल. पण बनावट प्रमाणपत्रावर बनावट सही करून देणारे निमानिराळेच राहतात. जिल्ह्यात एक शिक्षणाधिकारी इतके निर्ढावलेले होते की, जाऊ तिथं खाऊ असाच त्यांचा खाक्या होता. दोन वेळा त्यांना चौकशी अंती सस्पेंड करण्यात आले मात्र ते पुन्हा कामावर आले आणि पुन्हा त्यांचा धंदा सुरू झाला. अशा प्रकारचे लोक संपूर्ण व्यवस्था पोखरून टाकतात आणि तुम्ही आम्ही काहीच करू शकत नाही. मागे एकदा शिक्षण संचालकांनी ठिकठिकाणी तपासण्या करून अनेक अधिकारी वर्गाचे करोडोंचे घबाड बाहेर काढले होते. शिक्षण खात्याचे अधिकारी करोडपती होऊ शकतात ईतकी संपत्ती या क्षेत्रातून कशी काय निर्माण होऊ शकते हे एक कोडे आहे आणि ते कधीही सुटणारे दिसत नाही.

अशाप्रकारे भ्रष्ट अधिकारी आणि ज्यांचा शिक्षण क्षेत्राशी काडीचाही संबंध नाही असे लोक शिक्षण आणि राजकीय क्षेत्रात घुसल्याने दोन्ही क्षेत्रे त्यांनी नासवली आहेत. परीक्षा केंद्रावर खुर्ची टाकून सामुदायिक कॉपीची व्यवस्था करून देणारे शिक्षण महर्षी म्हणवले गेले असे लोक काय शिक्षणातील पावित्र्य अबाधित ठेवतील? म्हणूनच शालार्थ घोटाळ्यात पाळेमुळे खोदून सर्वांना गजाआड केले तरी प्रवृत्ती संपणार नाही. म्हणजेच हे सगळे चालू राहणार आहे. यावर एकच इलाज आहे आणि तो म्हणजे सामान्य जनांनी पुढाकार घेत लागलेली कीड संपविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.निद्रीस्त समाज स्वत:संपेल आणि इतरांनाही संपवून टाकेल. जिल्ह्यात रोजगार हमी योजनेत मोठा गैर व्यवहार झाला होता पण त्यात खोदा पहाड निकला चूहा अशी स्थिती झाली होती एक काळ असा होता की, रस्ते कागदावर होते परंतु प्रत्यक्षात ते रस्ते झालेच नाहीत.त्या भ्रष्टाचारात अनेकांचे बंगले, दागदागिने. झाले. जमिनी झाल्या. एकजात ठिकठिकाणी इस्टेट ब्रोकर तयार झाले. त्यांनी शहराचे जास्तीत जास्त विद्रुपिकरण कसे होईल ते बघितले. त्यांनी सर्व नियम धाब्यावर बसविले खूप पैसा कमवला. तेही राजकारणात आले. स्थानिक पातळीवरील राजकारणात त्यांनी कब्जा केला.लोकांना खरेदी करण्याची तयारी केली.निवडून आले आणि त्यांनी जो कारभार केला तो तुम्हा आम्हाला माहीत आहे. एके काळी आपला जिल्हा घासलेट पिणारा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. मुंबयी ते नागपूर आणि आग्रारोडने इंदूर पर्यंत त्यांच्या मालकीचे पंप होतै. प्रत्येक पंपावर रॉकेल ओतले जात होते.रॉकेलच्या आणि पेट्रोलच्या भावात दुपटीचा फरक असल्याने भरपूर कमाई होत असे.त्यातून रॉकेल माफिया जन्माला आले.त्यांनी धुमाकूळ घातला. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही ते आले अवैध पैशांचा वापर प्रतिष्ठा कमावण्यासाठी झाला. लोकांनीही त्यांना प्रतिष्ठा प्रदान केली. अशा प्रकारे बहुतांश लोकच रद्दी लोकांना डोक्यावर घेतात म्हणून त्यांचे फावते.अशा कितीतरी घोटाळ्यांची यादी देता येईल.नेहमी आपणच अग्रभागी असतो हे आपले वैशिष्ट्य म्हणावे लागेल. दूसरीकडे शिक्षण संस्थांना पर्यायी व्यवस्था खाजगी क्लासेसच्या निमित्ताने निर्माण झालेली आहे. तिथे मुले मुली मोठ्या प्रमाणावर शिकवणीला येतात. त्यांच्या यशाचे बॅनर लागतात. शाळा महाविद्यालये त्यामुळे गौण ठरतात. ती केवळ परीक्षा केंद्रे ठरली आहेत. म्हणून ती सर्व व्यवस्था रद्द करून सगळे क्लासेस विद्यापीठांना जोडून द्यावेत.परीक्षेची व्यवस्था क्लासेसवालेच करतील. परिणामी बनावट शालार्थ प्रमाणीकरण आणि त्यावर सही करणारे अधिकारी यांची काहीच गरज राहणार नाही. क्लासेस चालविण्यासाठी मग कोणीही दुकानदारी केली तरी हरकत नाही. कोणी वाडिले असो की देसले असोत. सर्वांना दुकाने चालविण्याची मुभा राहील. तशीही पालकांना आणि पाल्यांनाही ही दुकानेच पसंत आहेत. एकमेका सहाय्य करू अवघे धरू कुपंथ अशी उलटी म्हण आता यापुढे वापरावी लागणार आहे. आपल्या जिल्ह्याचे नेतृत्व करावे असे व्यक्तिमत्व आता आपल्या जिल्ह्यात नाही.चार तालुक्यातील चार नेते असेही वर्गिकरण करता येणार नाही. कारण प्रभाव असा कुणाचाच नाही. संस्कृती, परंपरा सोबतच मुलभूत विकासाच्या संकल्पना राबविणारा एखादा अपवाद सोडला तर कोणी दिसत नाही. त्रामुळे जिल्ह्याची सर्व क्षेत्रात पिछेहाट झालेली आहे. अवनती वेगाने होत आहे. अशा परिस्थितीत सामुदायिक नेतृत्व उदयाला येऊ शकते. गणसेवकत्वाची भूमिका त्यासाठी स्वीकारावी लागेल. तरच सकारात्मक असे काही तरी होऊ शकेल. त्या दिशेने प्रयतक न केल्यास नकारात्मक तुरेच जिल्ह्याच्या शीरपेचात खोवले जातील.

# धुळे महापालिकेच्या ऑनलाइन सेवेची सुरुवात
## सत्तर लोकसेवा हक्क सेवा घरबसल्या उपलब्ध



**धुळे, दि.१४ - धुळे महानगरपालिकेने नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा देण्याच्या उद्देशाने मध्यवर्ती कमांड अँड कंट्रोल विभाग सुरू केला असून, लोकसेवा हक्क अधिनियम (राईट टू सर्व्हिस) अंतर्गत येणाऱ्या सुमारे ७० सेवांसह विविध नागरी सुविधा आता पूर्णपणे ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत. या उपक्रमामुळे नागरिकांना महापालिकेत प्रत्यक्ष फेऱ्या मारण्याची गरज कमी होणार असून तक्रारींचे जलद निराकरण करण्यास मदत होणार आहे.**

महापालिकेच्या या नव्या प्रणालीद्वारे नागरिकांना स्ट्रीट लाईट बंद असणे, घंटागाडी वेळेवर न येणे, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच इतर नागरी समस्यांबाबत ऑनलाइन तक्रार नोंदविता येणार आहे. प्राप्त तक्रार संबंधित विभागाकडे तत्काळ पाठविली जाईल आणि तिचे वेळेत निराकरण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत जन्म-मृत्यू दाखले, विवाह नोंदणी, मालमत्ता कराशी संबंधित सेवा आणि इतर अनेक प्रमाणपत्रांसह एकूण प्रकारच्या सेवा ऑनलाइन उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

याशिवाय आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी शहरातीलमहत्त्वाच्या नाल्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून, त्यांची कार्यवाहीही लवकरच सुरू होणार आहे. पावसाळ्यात पूरस्थिती किंवा अन्य आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी या यंत्रणेचा उपयोग होणार आहे.

महापालिकेच्या या डिजिटल सेवांवर सात कर्मचारी सतत देखरेख ठेवत असून नागरिकांच्या तक्रारींचे नियमित परीक्षण केले जात आहे. तक्रारींचे दोन ते तीन दिवसांत निराकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

नागरिकांना ऑनलाइन सेवांचा लाभ घेण्यासाठी महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर, Dhule E-Connect App तसेच व्हॉट्सअॅप चॅटबॉटची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच कोणतीही तक्रार किंवा सूचना नोंदविण्यासाठी महापालिकेने टोल फ्री क्रमांक १८००-२३३-३०१० सुरू केला असून, या क्रमांकावर संपर्क साधून नागरिक आपल्या समस्या नोंदवू शकतात.महापालिकेच्या या डिजिटल उपक्रमामुळे नागरिकांना अधिक पारदर्शक, जलद आणि कार्यक्षम नागरी सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

# अपुऱ्या पावसाने वाढवली चिंता, कोरडवाहू शेतकरी धास्तावले

**शिरपूर दि.१५ (का.प्र.) - यंदाच्या खरीप हंगामाची सुरुवातच अनिश्चित पावसाने झाली आहे. जून महिना संपला तरी अनेक भागांत अपेक्षित पावसाऐवजी अत्यल्प पाऊस झाल्याने पेरण्या खोळंबल्या. जुलैच्या पहिल्या आठवड्यात काही ठिकाणी समाधानकारक पाऊस पडल्याने शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा जाग्या झाल्या. मात्र हा पाऊस प्रामुख्याने वरवरचा ठरल्याने जमिनीत खोलवर ओल निर्माण झाली नाही. त्यामुळे विशेषतः कोरडवाहू शेतीसमोरील संकट अद्याप कायम असून पिकांची वाढ खुंटू लागली आहे.**

कोरडवाहू भागातील शेती संपूर्णपणे पावसावर अवलंबून आहे. यंदा झालेल्या तुरळक आणि खंडित पावसामुळे जमिनीच्या वरच्या थरात काही प्रमाणात ओल निर्माण झाली असली, तरी ती काही दिवसांतच उन्हामुळे आटून गेली. परिणामी पिकांच्या मुळांना आवश्यक असलेला ओलावा मिळत नसल्याने त्यांची वाढ मंदावली आहे.

अनेक शेतकऱ्यांनी बाजरी, ज्वारी, मका, सोयाबीन, कापूस, तूर आदी पिकांची पेरणी केली आहे.

शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने बियाणे, खते, मशागतीसाठी कर्ज आणि इतर खर्च केला आहे. आता वेळेत आणि सातत्यपूर्ण पाऊस न झाल्यास हा सर्व खर्च धोक्यात येण्याची भीती आहे. अनेक शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले असून, पुढील काही दिवसांत चांगला आणि सलग पाऊस झाल्यासच खरीप हंगामाला काहीसा दिलासा मिळू शकतो.

दुष्काळ जाहीर करा, प्रा.अंतुर्लीकर यांची मागणी : शिरपूर तालुक्यात पावसाचे उशिरा आगमन झाल्यानंतर पर्जन्यमानही अल्प राहिले आहे. त्यामुळे तालुका दुष्काळी जाहीर करण्यात यावा अशी मागणी पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रा.पी.एस.अंतुर्लीकर यांनी केली.

प्रा.अंतुर्लीकर यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पश्चिम भागात वाघाडी गावापुढे अर्थे, विखरण, भामपूर, टेकवाडे, खामखेडा, वरुळ, भटाणे, जवखेडे, अंतुर्ली लोंढरे, तऱ्हाडी, अभाणपूर आदि परिसरात अत्यंत कमी पाऊस झालेला आहे. दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांसमोर उभे आहे. याची दखल घेऊन जिल्हाधिकारी व प्रांताधिकाऱ्यांनी शासनाकडे जिल्ह्यासह तालुक्याचा दुष्काळ सदृश्य परिस्थितीचा अहवाल पाठवून दुष्काळ जाहीर करावा व दुष्काळ निर्मूलनासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी प्रा.अंतुर्लीकर यांनी निवेदनातून केली.

# अक्कलकुवा ता. गुटख्याची कारवाई
## चार लाख ऐकोणसत्तर ह. माल जप्त

**नंदुरबार दि.१५- अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी परिसरात पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध साठ्यावर कारवाई करत ४ लाख ,६९ हजार ,३७० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी महेंद्र शांतीलाल जैन (वय ४६, रा. मोलगी, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीकडे विक्रीच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विमल पानमसाला, तंबाखू यांचा साठा आढळून आला.

कारवाईदरम्यान १ लाख ,६९ हजार ,३७० किमतीचा प्रतिबंधित पानमसाला व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा तसेच ३,००,००० किमतीची टाटा इंडिगो (एम एच -३९ जे -३९११) कार जप्त करण्यात आली. असा एकूण ४ लाख ,६९ हजार ,३७० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक धीरसिंग वसावे करीत आहेत. ही कारवाई पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी अर्जुन पटले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पान १ वरुन

## शिंदखेडा ता.तिन एसआयआर कॅम्पला

योग्य कागदपत्रांसह संकलन करण्यात आले. जमा झालेल्या अर्जांचे जागेवरच त्वरित डिजिटलायझेशन करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत ठाकरे सर, गावातील तरुण मंडळी आणि गावकऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. विशेष म्हणजे, जिल्हा परिषद शाळेच्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनीही या मोहिमेत उत्साहाने सहभाग घेतला.कॅम्पमधील अत्यंत पद्धतशीर आणि गतीमान काम पाहून मुख्य निवडणूक अधिकारी महादेव खेडकर यांनी पूर्ण समाधान व्यक्त केले व उपस्थित सर्व टीमचे कौतुक केले.

## कथितबोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या

सखोल चौकशी करून अहवाल जाहीर करण्यात यावा तसेच दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी हे बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. प्रशासन या मागणीची दखल घेऊन चौकशी अहवाल कधी जाहीर करणार आणि पुढील कारवाई काय करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नागरिकांनी न.पा.ची वाट न पाहता

शहरातील पटेल रेसिडेन्सी हॉटेल समोरील रस्ता हा वसंतराव नाईक माध्यमिक विद्यालय, गरीब नवाज कॉलनी आणि डॉ. राजेश जैन यांच्या रुग्णालयाकडे जाणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. या मुख्य रस्त्यावर विद्यार्थी, नागरिक, दुचाकी-चारचाकी वाहने आणि जड वाहनांची सतत वर्दळ असते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या रस्त्यावर तब्बल दीड-दीड फुटांचे खोल खड्डे पडले आहेत. खड्ड्यांमधील खडी बाहेर आल्यामुळे वेगाने जाणाऱ्या वाहनांच्या चाकांमुळे ही खडी उडून रस्त्या कडेला उभे असणाऱ्या नागरिकांना लागून अपघात घडत आहेत.जून महिन्यात झालेल्या सुरुवातीच्या पहिल्याच पावसात या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने अनेक दुचाकी चालकांचे वाहने घसरून अपघात झाले. यामध्ये अनेक शाळकरी विद्यार्थिनी, महिला व नागरिक जखमी झाले. हे डोळ्यादेखत घडणारे अपघात पाहून नागरिकांनी शहादा नगरपालिकेचे मुख्याधिकारी साजिद पिंजारी व संबंधित नगरसेवकांशी फोनवरून संपर्क साधून हा रस्ता दुरुस्त करण्याची वारंवार मागणी केली. मात्र, पालिका प्रशासनाकडून केवळ पोकळ आश्वासने मिळाली, प्रत्यक्षात कोणतीही कारवाई झाली नाही. नगरपालिका प्रशासन आणि बांधकाम विभागाच्या अत्यंत संथ व निष्काळजी कारभाराला कंटाळून अखेर परिसरातील व्यावसायिक व नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेतला. सर्वांनी मिळून स्वखर्चाने सिमेंट, वाळू आणि खडी आणून हॉटेल रेसिडेन्सी समोरील मुख्य रस्त्यावरील हे मोठे खड्डे सिमेंट कॉंक्रिटीकरण करून बुजवले. दोन दिवसांपूर्वीच हे खड्डे बुजवण्यात आल्याने आता येथून प्रवास करताना विद्यार्थी व वाहनधारकांनी सुटकेचा श्वास सोडला असून समाधान व्यक्त केले आहे. परंतु, जे काम नगरपालिकेचे होते, ते नागरिकांना स्वतःच्या पैशाने करावे लागत असल्याने पालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

शहादा शहरात ज्या रस्त्यांवर असे मोठे जीवघेणे खड्डे आहेत, ते नगरपालिका प्रशासनाने तातडीने बुजवणे अत्यंत गरजेचे आहे. या खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. कर भरूनही नागरिकांवर स्वतः रस्ता दुरुस्त करण्याची वेळ येते, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आणि शहादा शहराची मोठी शोकांतिका आहे.

- ईश्वर पाटील (अध्यक्ष, प्रवासी महासंघ, शहादा)

# जिल्ह्यातील मतदारांसाठी मदत कक्ष कार्यरत

**नंदुरबार, दि. १५ (प्रतिनिधी) - भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम वेगाने राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांना घेता यावा आणि त्यांच्या निवडणूक विषयक अडचणींचे त्वरित निवारण व्हावे, यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांच्या ठिकाणी विशेष ममदत कक्षफ स्थापन करण्यात आले आहेत. या मदत कक्षांचे संपर्क क्रमांक प्रशासनाकडून नागरिकांसाठी जाहीर करण्यात आले आहेत, अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविली आहे.**

विधानसभा मतदारसंघनिहाय मदत कक्ष व संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत:

जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार (निवडणूक शाखा): ०२५६४-२१०००८

०१-अक्कलकुवा (तहसील कार्यालय, अक्कलकुवा): ०२५६७-२५२२२६

अक्राणी (तहसील कार्यालय, अक्राणी): ०२५९५-२२०२३२


०२-शहादा (तहसील कार्यालय, शहादा): ९४०४४४२४४१ / ७६६६६३५३९०

तळोदा (तहसील कार्यालय, तळोदा): ०२५६७-२३२३६७

०३-नंदुरबार (तहसील कार्यालय, नंदुरबार): ०२५६४-२३२२६९

०४-नवापूर (तहसील कार्यालय, नवापूर): ०२५६९-२९५२८२

प्रकाश में आज पहेलीबार




अमिर खान, मनिषा कोईराला, परेश रावल, तन्वी आजमी, शफी इनामदार

# विद्यार्थ्यांनी नेत्रदानाचा संकल्प घ्यावा - भट

धुळे, दि.१५- मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांमधून दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनात आपण प्रकाश निर्माण करू शकतो त्यामुळे नेत्रदान हे केवळ सर्वोच्च दान नसून ती मानवतेची सर्वोच्च सेवा आहे, असे प्रतिपादन अण्णासाहेब चुडामन पाटील वैद्यकीय महाविद्यालयाच्या नेत्ररोग तज्ञ डॉ. केतकी भट यांनी विद्यावर्धिनी महाविद्यालयात केले.

राष्ट्रीय सेवा योजना, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि विद्यावर्धिनी महाविद्यालयाने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त हा नेत्रदान जनजागृती कार्यक्रम व नेत्र तपासणी कार्यशाळेचे आयोजन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. राजवीरेंद्रसिंग गावित होते. रासेयो जिल्हा समन्वयक, डॉ निलेश पाटील, डॉ. पायल केंद्रे, डॉ. हर्षदा पांडे, उपप्रचार्य पंजाबराव व्यास व राहुल वाघ याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. आज आपल्या देशात व समाजात नेत्रदानाबाबतची जागरूकता वाढवण्याची आवश्यकता असून प्रत्येक विद्यार्थ्याने नेत्रदानाचा संकल्प घेणे आहे, असेही डॉ. भट पुढे म्हणाल्या. नेत्रदानाबाबत समाजात जागृती निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांनी जनप्रबोधन करावे असे आवाहन उपप्राचार्य डॉ. गावित यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला डी एस सूर्यवंशी बाळासाहेब गणपत सर्जेराव गोल्डे मंगेश पाटील प्रशांत लगडे वैशाली पाटील उपस्थित होत्या. सूत्रसंचालन डॉ. बाजीराव पाटील व आभार प्रदर्शन तेजस कुलकर्णी यांनी केले.







**शब्दकोडे क्रमांक : २४१२**



**आडवे शब्द :** १. ज्ञान मिळवण्याचे पवित्र ठिकाण / विद्यालय २.लायब्ररी ५.मनाला आकर्षित करणारे ७.संगीत नाटकाच्या सुरुवातीला ईशस्तवन करण्यासाठी गायले जाणारे गीत किंवा मंगलाचरण ८.वस्ती १०.देह ११.इंग्रजीत-पायांची बोटं १२.मनुष्य १३.ताकद १५.होकार १७.पेन्सिलीचे टोक १८.तिखट विचारांचा २०.सातू २२.जबरी चोरी २४.तबल्याचा साथीदार २७.रिता २८.बुद्धी २९.चोर ३१.वेडा ३२.अंगाला भस्म लावणारा एक साधूंचा पंथ ३३.इंग्रजीत-नाही ३४.पुरावा ३६.नाश ३८.दाणेदार सांजा ४०.आळ ४२.चपाती बनवण्यासाठी वापरतात ते धान्य ४३.गदर ४.विषम नसलेला ४५.उपयोग ४७.पर्ण ४८.बाब ४९.मग्न ५०.मोकळीक ५२.कुख्यात गुंड दाऊदच्या डोळीचे संक्षिप्त रूप ५२.वज-उलट लिहा ५४.गरज ५५.इंग्रजीत-लक्ष्य ५६.संगीत सप्तकातील पाचवा स्वर **उभे शब्द :** १.फांदी २.चर्मवाद्यांना बसवतात ती चामड्याची दोरी ३.सांडपाणी वाहून नेण्याची पळी ना ४.म्लेंच्छ ५.हाव ६.हताश ७.हल ९.शिकार १२.वानर १४.भाकरीचे एक दळण १६.बारीक-विरुद्ध १९.नुकसान २१,वकिली २३.मजदूर २५.ट्युमर २६.घसा ३०.गोंधळ ३१.उघडा ३५.विक्री ३६.कुटुंब ३७.शहर ३९.पठण ४०.एक तुरट चवीचे फळ ४१.हल्ला करणारे ४४.सज्जड दम ४६.विनाश ४७.एक शेंगभाजी ५१.सूत

**शब्दकोडे क्रमांक : २४११ चे उत्तर**



## पान १ वरुन

### धुळे म.न.पा.च्या हॅप्पी हार्ट प्री स्कूलचे

सुसज्ज डिजिटल क्लासरूम व स्मार्ट लर्निंग व्यवस्था सर्व वर्ग खोल्यांमध्ये वातानुकूलित यंत्रणा, वॉटर पुरिफायर, डिजिटल शिक्षणासाठी प्रोजेक्टर, आवश्यक ऑडिओ व्हिज्युअल व्यवस्था, वायरलेस वाय-फाय नेटवर्क संपूर्ण शाळा परिसरामध्ये सी.सी.टी.व्ही., देखणी व्यवस्था आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन व्यवस्था तसेच संपूर्ण शाळेचे आधुनिक पद्धतीने नूतनीकरण व आकर्षक रंगरंगोटी व सुशोभीकरण करण्यात आलेले आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी लहान विद्यार्थ्यांच्या हाताने फीत कापून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला तसेच याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले

या शुभारंभ कार्यक्रमास आयुक्त नितीन कापडणीस, महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर सौ जोत्सना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, महिला बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, माजी महापौर कल्पना महाले, नगरसेवक सुनील बैसाणे, सुभाष जगताप, कमलेश देवरे, ललित अरूजा, रोहित चांदोडे, नगरसेविका डॉ. निशा महाजन, चित्रलेखा परदेशी, सामाजिक कार्यकर्ता महादेव परदेशी, प्रफुल्ल पाटील, उपायुक्त हेमंत निकम, मनोज वाघ, सहाय्यक आयुक्त डॉ.सोनाली देवरे-पगार, प्रशासनाधिकारी दासरवाड, शहर अभियंता चंद्रकांत उगले, उपअभियंता पराग ठाकरे, प्रणव शिंदे तसेच पालक विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

### आर.पी.आय.आठवले गट; बैठकीचे आयोजन

वाल्मिक दामोदर, महेंद्र निळे, एस.आर.बागुल, शशिकांत वाघ, रामभाऊ माणिक दोंडाईचा आदि मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीसाठी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### दिव्यांगाना सहा हजार रूपये पेन्शन देण्याची मागणी

यांची भेट घेऊन राज्य सरकारकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. भाजप दिव्यांग विकास आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा दिव्यांग जनसंवाद फाऊन्डेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अमोल देवाजी वाळके यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठविण्यात आले. राज्यातील लाखो दिव्यांग नागरिकांना सन्मान, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेने जीवन जगता यावे, यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दिव्यांगांना पेन्शन वाढवून ती दरमहा किमान सहा हजार रुपये करण्यात यावी. पेन्शन रक्कम प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपूर्वी बँक खात्यात जमा व्हावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय नागपूर, मुंबई, पुणे आणि नाशिकसह प्रमुख शहरांमध्ये दिव्यांगांसाठी स्वतंत्र व्यावसायिक मॉल उभारावेत.रस्त्याकडील स्टॉलधारक दिव्यांगांना कायदेशीर संरक्षण द्यावे आणि सुशिक्षित दिव्यांगांना दरमहा पंधरा हजार रुपयांचे मानधन किंवा शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. शासकीय आणि खासगी क्षेत्रात दिव्यांगांसाठी सहा टक्के आरक्षण सक्तीचे करणे, दरवर्षी पंधरा लाख रुपयांपर्यंतचा मोफत आरोग्य विमा लागू करणे आणि घरकुल योजनांमध्ये प्रथम प्राधान्य देण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये दिव्यांगांना शंभर टक्के मोफत प्रवासाची सुविधा द्यावी, तसेच भारतीय रेल्वेच्या प्रमुख गाड्यांमध्ये दिव्यांग डबा गाडीच्या मध्यभागी जोडावा. प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग क्रीडा महोत्सव आयोजित करावा आणि दिव्यांग खेळाडूंना शासकीय नोकऱ्यांमध्ये पाच टक्के आरक्षण द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. या सर्व मागण्यांवर राज्य सरकारने सकारात्मक आणि तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा भाजप दिव्यांग विकास आघाडीने व्यक्त केली आहे.

### चाकुचा धाक दाखवत तीन लाखांची वसुली

चाकूचा धाक दाखवून त्याला दुचाकीवर बसवून जवळच एका खोलीत नेले. तेथे त्याच्याकडे तीन लाख रुपयांची खंडणी मागितली. संशयितांनी दोन क्यूआर कोडचा वापर करुन ऑनलाईन पैसे घेतले. शिक्षकाच्या फिर्यादीवरुन संशयित पवन हटकर, वैभव सूर्यवंशी व बंटी नामक संशयिताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. संशयित हटकर व सूर्यवंशी यांना पोलिसांनी अटक केली. त्यांना शिरपूर न्यायालयासमोर हजर केले असता १८ जुलैपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली असून सहायक निरीक्षक सतीश भांड पुढील तपास करीत आहेत.

### पिंपळनेरला प्रसूतीदरम्यान महिलेचा

डॉक्टरांवर कारवाईची मागणी केली. आंदोलन दरम्यान रस्ता रोको करण्यात आले. तसेच रुग्णालयावर दगडफेक झाल्याची घटना घडली. परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत सौम्य लाठीमार करून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतर नातेवाईकांनी पिंपळनेर पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. रात्री उशिरा संबंधित डॉक्टर राहुल तावडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मृत्यूचे नेमके कारण आणि उपचार प्रक्रियेत कोणतीही हलगर्जी झाली का, याचा तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत. दरम्यान, डॉक्टरांकडून या आरोपांवर अधिकृत भूमिका स्पष्ट झालेली नाही. तपास पूर्ण झाल्यानंतरच घटनेचे नेमके स्वरूप स्पष्ट होणार आहे.

### गंगामाई फार्मसी कॉलेजमध्ये बोगस

हजार ४०० रुपयांची शासनाची फसवणूक केली. या संदर्भात उच्च शिक्षण जळगाव विभागाचे सहसंचालक पराग मसराम रा. आकाशवाणी चौक, जळगाव यांनी फिर्याद दिली. त्यानुसार हेड ऑफ इन्स्टीट्युट जाफरान (पूर्ण नाव समजू शकते नाही), इन्टीट्युट ऑफ नोडल ऑफिसर एम.डी. अब्दूल, समबोर्ड ई तसेच इतर ४४ बोगस विद्यार्थी (पत्ता समजू शकला नाही) यांच्याविरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियमान्वये गुन्हा दाखल झाला. पोलीस निरीक्षक विनोद पाटील तपास करीत आहेत.

### प्रलंबित देयकांसाठी महापालिका

तसेच वेतन आयोगाच्या फरकाची रक्कमही काही कर्मचाऱ्यांची प्रलंबित असल्याचे निवेदनात म्हटले आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन सर्व प्रलंबित देयके अदा करावीत. अन्यथा अठरा जुलै २०२६ पर्यंत न्याय न मिळाल्यास आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन व आमरण उपोषण करण्यात येईल. तसेच आंदोलन दरम्यान उद्भवणाऱ्या परिस्थितीची जबाबदारी महापालिका प्रशासनाची राहिल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर सेवानिवृत्त कर्मचारी मधुकर शिवराम बावरे, मुकुंद रामदास शिंदे आणि सुरेश आत्माराम पाटील यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती महापौर, स्थायी समिती सभापती, नगरसेवक, उपायुक्त, धुळे शहर पोलिस निरीक्षक तसेच संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

### पावसासाठी डोंगरगावच्या महिला उतरल्या मैदानात

पाऊस दे रे देवा, शेतकऱ्याला पावसात भिजू दे, पाणी हेच जीवन यासह विविध भजनांच्या आणि ओव्यांच्या गजरात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. महिलांनी प्रत्येक घरासमोर थांबून पावसासाठी प्रार्थना केली. ही पारंपरिक मान्यता आहे की महिला अशा प्रकारे घरोघरी फिरून भिक्षा मागतात आणि देवाला आळवतात तेव्हा इंद्रदेव प्रसन्न होऊन वरूणराजा बरसतो.

भूजल पातळीत मोठी घट: गेल्या वर्षीही तालुक्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. यंदा जुलै महिना अर्ध्यावर संपत आला तरी मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. वातावरण तयार होते पण गळतीच लागत नाही. कोकिळ शिडकाव्याशिवाय पावसाचा थेंब नाही. धरणे, नाले, विहिरींमधील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. शेतात पेरण्या खोळंबल्या असून शेतकरी चिंतेत आहे. याच पार्श्वभूमीवर महिलांनी हा आगळा-वेगळा प्रयतक केला आहे.

यावेळी मोठ्या संख्येने ज्येष्ठ महिला तरुणींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कॉलनीतील पुरुषांनीही त्यांना सहकार्य केले. फेरीदरम्यान अनेक घरांमधून महिलांना हळद-कुंकू, अक्षता देऊन त्यांच्या प्रार्थनेला साथ देण्यात आली. शेती जगली तर आम्ही जगू. पाऊस नाही तर सर्वच ठप्प होईल. म्हणून आम्ही आमच्या लेकरांसाठी, शेतासाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी देवाकडे पावसाचे साकडे घातले आहे, अशी भावना एका महिलेने व्यक्त केली. महिलांच्या या श्रद्धा आणि एकजुटीचे शहरात सर्वत्र कौतुक होत असून आता त्यांच्या हाकेला वरुणराजा कधी ओ देतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पान १ वरुन

### राज्यातील शेतकऱ्यांचे अठ्ठेचाळीस हजार कोटींचे

शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला.

**कर्जमाफीतील जाचक अटी रद्द**

दोन लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी आणि नियमित कर्ज भरणाऱ्यांना पन्नास हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान, या योजनेची अंमलबजावणी करताना सरकारने सुरुवातीला काही अटी घातल्या होत्या. मात्र, आमदारांच्या आग्रहानंतर त्या अटी रद्द करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आर्थिक शिस्त लागावी म्हणून २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्यांना या नवीन योजनेतून वगळण्यात आले होते. मात्र, महायुतीच्या पंचवीस-तीस आमदारांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ही अट रद्द करण्याची विनंती केली. यामुळे बारा लाख शेतकरी वंचित राहिले असते. आमदारांचा आग्रह योग्य वाटल्याने सरकारने ही अट रद्द केली. आता जुन्या योजनेत पात्र ठरूनही नंतर थकित झालेल्या बारा लाख शेतकऱ्यांना या दोन लाखांच्या कर्जमाफीचा सरसकट लाभ मिळणार आहे.

**कर्ज भरण्याची अट रद्द**

यंदा अल-निनोचे संकट असल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणी आणि दुष्काळाचे सावट आहे. अशा परिस्थितीत प्रोत्साहनपर पन्नास हजार रुपये मिळवण्यासाठी चालू वर्षाचे कर्ज भरणे आवश्यक आहे, ही अट अन्यायकारक असल्याचे आमदारांनी निदर्शनास आणून दिले. मुख्यमंत्र्यांनी तत्काळ ही अटही रद्द केली. आता मागील तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमित परतफेड करणाऱ्यांना पन्नास हजार रुपयांचा लाभ मिळणार आहे.

### ना.बावनकुळेंच्या आदेशाने भुमाफीयांचे धाबे दणाणले

जमिनींची खरेदी-विक्री करणे असे गंभीर प्रकार घडल्याचे निदर्शनास आणून दिले. यामागे संघटित स्वरूपाचे रॅकेट कार्यरत असल्याची शक्यताही व्यक्त करत ही संघटित गुन्हेगारी संपूर्ण राज्यात फोफावल्याची गंभीर बाबही निदर्शनास आणली होती.

**मंत्री बावनकुळेंचे चौकशीचे आदेश**

आमदार अग्रवाल यांच्या लक्षवेधीची गांभीर्याने दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय सखोल चौकशी करण्याचे व महिनाभरात अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्यानुसार कक्ष अधिकारी तेजश्री बिडकर यांनी विभागीय महसूल आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक व भूमी अभिलेख अधीक्षकांना पत्र पाठविले आहे.

**कोणत्या प्रकरणांची होणार चौकशी?**

मंत्री बावनकुळेंच्या आदेशानुसार धुळे शहरासह जिल्ह्यात कुळवहिवाट कायद्याचा भंग करून शेतकरी नसताना परराज्यांतील व्यक्तींनी बेकायदेशीर शेतजमिनी लाटल्या आहेत का, याची चौकशी होणार आहे. यासाठी विभागीय महसूल आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विशेष त्रिसदस्यीय समिती नियुक्त करून शासनाला अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय धुळे येथील फायनल प्लॉट क्रमांक ७९/अ संदर्भात ८ जुलै २०१० च्या फेरफार क्रमांक ९६२२ अन्वये शंकर किसन पाटील यांच्या वारसांची बोगस नोंद मंजूर करण्यात आली होती. या सदोष नोंदीच्या आधारे ९ मार्च २०२२ रोजी दस्त क्र. १७५७ अन्वये सलीम सिकंदर शेख यांना ही जमीन विक्री करण्यात आल्याच्या व्यवहाराची चौकशी होणार आहे. तसेच नगर भूमापन अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता नियम १९६६ च्या कलम १५५ चा गैरवापर करून डेटा रिस्ट्रक्चरिंगच्या नावाखाली १० मार्च २०२३ रोजी कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी किंवा पडताळणी न करता क्षेत्र दुरुस्तीची नोंद प्रमाणित करण्यात आली. या प्रकरणी शासनाने जयप्रकाश गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या मूळ ४४ सभासदांना दिलासा देताना या बोगस नोंदी रद्द करून या ४४ सभासदांची नावे कायम करण्याचे आदेश भूमी अभिलेखच्या जिल्हा अधीक्षकांना दिले आहेत. तसेच या प्रकरणाच्या पुनरीक्षणाचा प्रस्ताव पुणे येथील भूमी अभिलेखच्या जमाबंदी आयुक्त व संचालकांमार्फत शासनाकडे सादर केला जाणार आहे.

**भूमाफियांसह भ्रष्ट अधिकाऱ्यांचे दणाणले धाबे**

महसूलमंत्री बावनकुळे यांनी या सर्व गंभीर प्रकारांची गांभीर्याने दखल घेत संबंधित सर्व विभागांनी तत्काळ नियमोचित कारवाई सुरू करावी, केलेल्या कारवाईचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल एक महिन्याच्या आत शासनाकडे सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या वादग्रस्त मिळकतींमध्ये बनावट वारस नोंदवून, जमिनींचे एकाकडून दुसऱ्याकडे, दुसऱ्याकडून तिसऱ्याकडे बेकायदा हस्तांतर करण्यात आले आहे. या सर्व गैरव्यवहारांची संपूर्ण चौकशी करण्याचे व दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश धुळे जिल्हा पोलिस अधीक्षकांना देण्यात आले आहेत. आमदार अग्रवाल यांनी या प्रकरणी लक्षवेधीद्वारे विधानसभेत उठविलेल्या आवाजामुळे जिल्ह्यातील भूमाफियांसह नगर भूमापन कार्यालयातील भ्रष्ट अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

### युद्धामुळे संकट निर्माण गॅस दरवाढीचा धोक

सुरु झाल्याने गॅस टंचाईचा धोका निर्माण होऊ शकतो. भारत आपल्या एलपीजीच्या गरजांपैकी बहुतांश गरजा परदेशातून आयात करतो. ज्यापैकी नव्वद टक्के गॅस होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे भारतात येतो. त्यामुळे गॅसचा तुटवडा सर्वांत मोठा धोका आहे. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत भारताला गॅसच्या तीव्र तुटवड्याचा अनुभव आला. जर युद्धामुळे सागरी मार्ग पुन्हा विस्कळीत झाला तर घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्या परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही, तर किमतीही वाढू शकतात.

**सरकारी तेल कंपन्यांना तोटा**

पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवता न आल्याने तेल कंपन्यांना जसा तोटा झाला, तसाच त्यांना गॅसमुळेही मोठा तोटा झाला. सरकारी आकडेवारीनुसार जून २०२६ पर्यंत सरकारी तेल कंपन्यांना घरगुती एलपीजी सिलेंडरमागे पाचशे ते सातशे रुपयांचा तोटा होत होता. त्यामुळे आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा वाढल्या, तर सरकारकडे दोन पर्याय असतील. एक तर अनुदान वाढवणे किंवा सिलिंडरच्या किमती वाढवणे. सध्या भारताकडे . दशलक्ष मेट्रीक टनचा सामरिक पेट्रोलियम साठा आहे.

### विवाहित मुलीला देखील अनुकंप नोकरी अधिकार

मात्र, राष्ट्रीय कोळसा वेतन करारातील नियमांचा आधार घेत दहा एप्रिल २०२५ रोजी त्यांचा अर्ज फेटाळला होता. विवाहित मुलीला अनुकंपा नोकरी देता येणार नाही, अशी भूमिका व्यवस्थेने घेतली होती. यानंतर तनुजा झाडे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयाने ही याचिका मंजूर करत व्यवस्थेचा आदेश रद्द केला. मुलगा विवाहित असला तरी त्याला अनुकंपा नोकरीचा लाभ मिळू शकतो, तर मुलीलाच केवळ विवाहित असल्यामुळे नकार देणे हा भेदभाव ठरतो. असा भेदभाव संविधानातील समानतेच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे मत न्यायालयाने व्यक्त केले.

### जिल्हा रुग्णालयात एम.आर.आय.सेवेचे

प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांनी हा प्रश्न सातत्याने लावून धरला. त्यांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश मिळाल्याने धुळे जिल्हा रुग्णालयात एम.आर.आय. मशीन उपलब्ध झाली असून, आता जिल्ह्यातील रुग्णांना निदानासाठी इतर शहरांमध्ये जाण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

या पार्श्वभूमीवर अमीन पटेल यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवी सोनवणे यांच्या समवेत नव्याने उपलब्ध झालेल्या एम.आर. आय. मशीनची पाहणी करून तिच्या कार्यपद्धतीची माहिती घेतली. यावेळी रुग्णांना ही सेवा अधिक प्रभावी, दर्जेदार आणि वेळेत उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच एम.आर. आय. मशीनचे लोकार्पण येत्या १५ ऑगस्ट रोजी होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

या पाहणी दौऱ्यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष भा.ई.नगराळे, सेवा दलाचे शहराध्यक्ष राजेंद्र खैरनार, धुळे शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा भावना गिरासे, अब्दुल हक, नवीन अख्तर, सुफिक अहमद, अबुलास खान, आसिफ अन्सारी, रईस अहमद, मुजाहिद हुसेन, आसिफ भाई, वकील अहमद, कुर्बान अन्सारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## डॉ.गणेश मुळेंना मानद डी.लिट

नागपूर, दि.१५- माहिती व जनसंपर्क विभागाच्या नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश वसंतराव मुळे यांचा साऊथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटीतर्फे मानद डी.लिट. देऊन गौरव करण्यात आला.

चेन्नई येथे झालेल्या शानदार सोहळ्यात ग्लोबल एज्युकेशन मिशनचे डॉ. आर. सेल्वम यांच्या अध्यक्षतेखाली, तामिळनाडू क्रीडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.ए.एम.मूर्ती यांच्या हस्ते डॉ.मुळे यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास माजी न्यायमूर्ती डॉ. व्ही.के. व्यंकटेशन, आंध्रप्रदेशचे माजी न्यायमूर्ती जे. हरिदास, प्रसिद्ध दाक्षिणात्य चित्रपट निर्माते व अभिनेते मनघई हरिराजन हे मान्यवर यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

देशभरात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा शोध घेऊन दरवर्षी या विद्यापीठातर्फे त्यांना मानद डिलिट प्रदान करण्यात येत असते. डॉ. मुळे यांनी शैक्षणिक, संशोधन, मानवाधिकार, सामाजिक मूल्ये, नैतिक शिक्षण, सामाजिक जबाबदारी आदी क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना डी. लिट. या मानद पदवीने गौरविण्यात आले आहे.

**भाड्याने देणे आहे**
जे.बी.रोड, धुळे
आकाश हॅण्डलुम समोरील
११X१०० फुट
- संपर्क -
7499824718
9764131189

**मुले पाहिजेत**
१ ग्राफिक्स् डिझायनर व डि.टी.पी. ऑपरेटर मुलगा पाहिजे. मराठी टायपिंग येणे आवश्यक. (अनुभव आवश्यक)
१ बाईंडर (अनुभव आवश्यक)
२ हेल्पर व ऑपरेटर (कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक)
अर्जासह भेटा
नहुष डिजिटल प्रिंटर्स, धुळे
9028921347
8788942027

## कौशल्ये आत्मसात केल्यास यशाचा मार्ग अधिक सुलभ होईल- प्रा.राजेंद्र अहिरे




**साक्री, दि.१५- खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या युगात रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून केवळ पदवी प्राप्त करणे पुरेसे राहिलेले नाही. आधुनिक करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक ज्ञानाबरोबरच संवादकौशल्य, नेतृत्व, समस्या सोडविण्याची क्षमता, डिजिटल साक्षरता, कृत्रिम बुद्धिमत्ता, संघभावना आणि वेळेचे प्रभावी व्यवस्थापन यांसारखी आधुनिक कौशल्ये विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. ही कौशल्ये आत्मसात केल्यास जागतिक स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी यशाचा मार्ग अधिक सुलभ होईल, असे प्रतिपादन विद्या विकास मंडळाच्या सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी केले.**

विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री येथील राष्ट्रीय छात्र सेना एन.सी.सी.च्या वतीने जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त आयोजित आधुनिक करिअरसाठी आवश्यक कौशल्यांमधील बदल या विषयावरील विशेष व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत पाटील होते. व्यासपीठावर राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रमुख लेफ्टनंट डॉ. भूषण अहिरराव तसेच न्यू इंग्लिश स्कूल, साक्री येथील राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी मनीष सोनवणे उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. राजेंद्र अहिरे म्हणाले की, आजच्या बदलत्या रोजगारविश्वात विद्यार्थ्यांनी सतत शिकण्याची वृत्ती जोपासणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानातील बदल स्वीकारत नवीन कौशल्ये आत्मसात करणारे विद्यार्थीच भविष्यात यशस्वी ठरतील. महाविद्यालयीन जीवनातच विद्यार्थ्यांनी स्वतःची उद्दिष्टे निश्चित करून सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि अविरत परिश्रम यांना जीवनमंत्र बनवावे. यश ही कोणतीही योगायोगाने मिळणारी गोष्ट नसून सातत्यपूर्ण प्रयतक, आत्मविश्वास आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती यांचे फळ असते, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधींकडे न पाहता उद्योजकतेकडेही सकारात्मक दृष्टीने पाहावे, कौशल्याधारित शिक्षणाद्वारे स्वतः सह इतरांसाठी रोजगारनिर्मिती करण्याची क्षमता विकसित करावी, असे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. अनंत पाटील यांनी राष्ट्रीय छात्र सेना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयतक्शील असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना भारतीय सैन्य, नौदल, हवाई दल तसेच इतर संरक्षण सेवांमध्ये करिअर करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रेरणा दिली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे अनेक विद्यार्थी दरवर्षी संरक्षण क्षेत्रातील विविध सेवांमध्ये यश मिळवत असून ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन लेफ्टनंट डॉ. भूषण अहिरराव यांनी केले. कार्यक्रमास राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**WALK IN INTERVIEW**
We are looking highly experienced and skilled personnel for one of our leading Solvent Extraction Plant & Edible Oil Refinery situated at M.I.D.C, Dhule (Maharashtra)
**Accountant/Data Entry Operator - 2 Post each (M)**
(B.com/Tally prime is must and having minimum 2 years' experience)
**Godown Supervisor- Post-2 (M)**
(Graduate with 1 year experience)
**Edible Oil Filling Machine Operator - Post -2 (M)**
(Candidate should have experience in operation and maintenance of fully automatic Pouch filling Machine, Multi head Jar filling Machine (Span Pack) & Multi head Tin filling Machine (Span Pack)
Interested candidates may come for **Walk in Interview** on below address on **18.07.2026 to 20.07.2026 between 3:30 pm to 5.30 pm** along with Bio-data, Testimonials and Passport size photo is essential.
**Please note, candidates who had been interviewed previously for above post need not re-apply.**
**Sanjay Soya Private Limited**
E-131/1, M.I.D.C., Behind S.T. Workshop, Awadhan, Dhule.

**पाहिजेत**
आर.एम.ओ
नर्सिंग स्टाफ (ब्रदर–सिस्टर)
ओ.टी.असीस्टंट
वार्डबॉय
स्वयंपाकसाठी महिला
वॉचमन
अर्जासह समक्ष भेटणे
निरामय हॉस्पीटल
८० फुटी रोड, धुळे

**पाहिजेत**
१०वी, १२वी पास असलेली हुशार व अनुभवी मुले लावणे आहेत. जागा –५ मुले
–: संपर्क :–
सोमनाथ ओनियन सप्लायर्स
दु.नं.५, कॉटन मार्केट यार्ड, पारोळा रोड, धुळे
9604090099
9420005990

**पाहिजे**
होलसेल एजन्सी कामासाठी मॅनेजर पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान तसेच Tally Prime चे बेसिक ज्ञान आवश्यक.
आकर्षक पगार.
– संपर्क –
Konnect Corporation
नवग्रही गल्ली नं.२, श्रीराम पेन समोर, धुळे
7020165218
9850096250

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**
इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
–: संपर्क :–
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**पाहिजेत**
स्वर्ण पॅलेस ज्वलर्स
सेल्समन – १
सेल्समॅडम – १
हेल्पर – २
आग्रा रोड, धुळे
02562 232428/ 355891

**ड्रायव्हर पाहिजे**
हुशार, होतकरु व अनुभवी व निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे.
समक्ष भेटा
- संपर्क -
9823178279

**Wanted**
Pharmacist 1 Year Experience Holer (P.c.Handaling, customer Handaling)
- Contact -
9823833108

Godrej
27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर.

आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट
BAJAJ FINSERV
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
फायनान्सला लागणारी कागदपत्रे
1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक
59 वर्षांपासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०